पुढारी

# पालघरात घरकुलांचे काम समाधानकारक

## पंचवीस हजार घरकुलांपैकी २१ हजार घरे बांधून पूर्ण

**पालघर : सचिन जगताप**

पालघर जिल्ह्यात सर्वांसाठी घरे या संकल्पने अंतर्गत महाआवास योजना जिल्ह्यातील गावागावांमध्ये राबविण्यात येत असली तरी महाआवास योजनेच्या आधीपासून पालघर जिल्ह्यात पंतप्रधान आवास योजनेचे काम समाधानकारक सुरू आहे. ग्रामीण विकास यंत्रणेच्या राज्यस्तरीय अधिकाऱ्यांनी तशी ग्वाही पालघर जिल्ह्यात झालेल्या बैठकीत दिली आहे.

पालघर जिल्ह्यात २०१६ ते २०२१ या आर्थिक वर्षात २५ हजार ८०५ घरांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. आत्तापर्यंत २१ हजार ४०६ घरे बांधून पूर्ण झाली असून काही तांत्रिक कारणांमुळे चार हजार चारशे घरे अपूर्णावस्थेत आहेत. यामध्ये लाभार्थ्यांचे खाते क्रमांक न जुळणे लाभार्थ्यांनी काही टप्प्यात काम पूर्ण करणे यामुळे ही घरकुले प्रलंबित आहेत पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत २५ हजार ७६३ घरे यांचे जिओ टॅगिंग पूर्ण झाले आहे. घरकुल मंजूर झालेल्या २५ हजार घरांपैकी २५ हजार ३२९ लाभार्थ्यांना घरकुलाचा पहिला हप्ता देण्यात आलेला आहे. यातील ४३४ लाभार्थी तांत्रिक कारणामुळे या हप्त्यात पासून वंचित आहेत, याचबरोबरीने २३ हजार ६२४ जणांना कामाचा पहिला टप्पा पूर्ण केल्यामुळे दुसरा हप्ता देण्यात आलेला आहे तर कामाचा तिसरा टप्पा पूर्ण केलेल्या २२ हजार ६४२ लाभार्थ्यांना तिसरा हप्ताही देण्यात आलेला आहे. यामध्ये १५ हजार ६४ लाभार्थ्यांनी कामाचा चौथा टप्पा पूर्ण केल्याने त्यांना चौथा हप्ता प्राप्त झाला आहे, तर २१ हजार ४०६ लाभार्थ्यांनी आपले घर पूर्णपणे बांधून तयार केल्याने त्यांना शेवटचा हप्ता ही जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत विविध पंचायत समिती स्तरावर देण्यात आलेला आहे.



### ८० टक्क्यांपेक्षा जास्त उद्दिष्ट

घरकुल योजना बरोबरीने पालघर जिल्ह्यात रमाई आदिम आधी राज्य शासनाच्या घरकुल योजना यांची अंमलबजावणी ही प्रभावीरीत्या होत असून जिल्ह्याला असलेल्या उद्दिष्टा पैकी ८० टक्क्यांपेक्षा जास्त उद्दिष्ट आतापर्यंत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत पूर्ण करण्यात आलेले आहे.

"

पालघर जिल्ह्यात केंद्र व राज्य स्तरीय घरकुल योजना याची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून घरकुलांबाबतचे जिल्ह्याचे काम समाधान करत आहे. जिल्ह्यातील एकही लाभार्थी घरकुल पासून वंचित राहणार नाही असे प्रयत्न जिल्हा परिषदेमार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धाराम शालिमार यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहोत.

**माणिक दिवे,** प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

### अशी आहे आकडेवारी

**डहाणू तालुक्यात ६ हजार ६१७, जव्हार तालुक्यात ३३११, मोखाडा तालुक्यात ३८७८, पालघर तालुक्यात २३६९, तलासरी तालुक्यात ३२११, वसई तालुक्यात ३९३, विक्रमगड तालुक्यात तीन हजार ४६१ तर वाडा तालुक्यात २४६५ उद्दिष्ट घरकुल अंतर्गत २०१६ ते २०१९ पर्यंत ठेवण्यात आले आहे. यामध्ये जिओ-टॅगिंग पूर्ण झालेले २५ हजार ७६३ घरांचा समावेश आहे तर आतापर्यंत डहाणू तालुक्यात पाच हजार २५८, जव्हार तालुक्यात २९५१, मोखाडा तालुक्यात ३५१८, पालघर तालुक्यात १८६६, तलासरी तालुक्यात २६००, वसई तालुक्यात ३५५, विक्रमगड तालुक्यात २७१४ तर वाडा तालुक्यात २०५७ घरकुले पूर्ण झालेली आहेत. अशी एकूण २१ हजार ४०६ घरकुल पूर्ण बांधून आहेत. यामध्ये ४ ३५७ पात्र लाभार्थी यांची घरे मंजूर असून ती अपूर्णावस्थेत आहेत तर उद्दिष्टा पैकी ४३९९ घरे विविध तांत्रिक कारणास्तव अपूर्णावस्थेत राहिलेली आहेत.**

My Thane Edition
Feb 6, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in